**प्रेसनोट** दि. 06/05/2026

**ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे कडून कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील पोलीस हवालदार याचेवर लाच मागणी व लाच स्विकारलेप्रकरणी तसेच शासकीय कामात अडथळा आणलेप्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे घटक** |
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलमान्वये |
| **तक्रारदार** | पुरुष वय 52 वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | गणेश शहाजी कसपटे, वय 40 वर्ष, पद पोलीस हवालदार बक्कल नंबर 2781, नेम.- कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर, पत्ता रा.- फ्लॅट नंबर 306, शंकर सुमन हाईट्स, भेकराईनगर, शिवशक्ती चौक, फुरसुंगी, पुणे **(वर्ग- 3)** |
| **सुरवातीची लाच मागणी** | रू. 2,50,000/- मागणी करून तडजोडीअंती रू.2,00,000/- (दोन लाख रुपये) |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी** | रू.1,50,000/- (दीड लाख रुपये) |
| **पडताळणी दिनांक** | दि. 05/05/2026 रोजी |
| **स्वीकारलेली लाच रक्कम** | रू.1,50,000/- (दीड लाख रुपये) |
| **सापळा दिनांक** | दि. 06/05/2026 रोजी 14.08 वाजता |
| **ठिकाण** | सुलक्स कल्पतरू गार्डन सोसायटीसमोर,पानटपरीजवळ,बोटक्लब रोड,पुणे येथे |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. प्रविण निंबाळकर, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9552574140) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती भारती मोरे, सहा.पोलीस आयुक्त,लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9870156586) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार हे काम करीत असणाऱ्या कंपनीचे मालक यांचेविरुद्ध हैदराबाद कोर्टमध्ये चेक बाउन्स ची केस चालू होती त्या केस मध्ये तक्रारदारांचे मालकास नॉन बेलेबल वॉरंट निघालेले होते, त्याची बजावणी न करण्यासाठी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार गणेश कस्पटे यांनी यापूर्वी दिनाकं 7/03/2026 रोजी तक्रारदारांच्या मालकांकडून पाच लाख रुपये लाचेची मागणी करून स्वीकारलेले आहेत, पुन्हा दिनांक 01/05/2026 रोजी पोलीस हवालदार गणेश कस्पटे यांनी सदर वॉरंट परत आले असल्याचे सांगून तक्रारदार यांच्या मालकांकडे अटक न करण्यासाठी व मदत करण्यासाठी अडीच लाख रुपये लाचेची मागणी केली परंतु तक्रारदार यांचे मालक आजारी असल्याने तक्रारदार हे पोलिस हवालदार गणेश कस्पटे यांना भेटले असता त्यांनी तक्रारदारांच्या मालकाचे हैदराबाद कोर्टाचे नॉनबेलेबल वॉरंट मध्ये अटक न करण्यासाठी व मदत करण्यासाठी स्वतःसाठी अडीच लाख रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती दोन लाख रुपये लाचेची मागणी केली असल्याची तक्रारदार यांनी दि. 05/05/26 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे तक्रार दिली होती.

प्रस्तुत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. 05/05/2026 रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता, तक्रारदार यांच्या मालकांना हैदराबाद येथील कोर्टाच्या वॉरंटमध्ये अटक न करण्यासाठी व मदत करण्यासाठी यापूर्वी पाच लाख रुपये रक्कम स्वीकारल्याचे मान्य करून दोन लाख रुपये लाच मागणी करून तडजोडीअंती दीड लाख रुपये लाचेची मागणी केली असल्याचे व लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शवल्याची निष्पन्न झाले आहे.

वर नमूद प्रमाणे लाच मागणी झाल्यानंतर दिनांक 06/05/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे पथकाने सापळा कारवाई केली असता तक्रारदार यांच्या मालकांना हैदराबाद येथील कोर्टाच्या वॉरंटमध्ये अटक न करण्यासाठी व मदत करण्यासाठी आरोपी लोकसेवक गणेश कसपटे, पोलीस हवालदार, कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन यांनी सुलक्स कल्पतरू गार्डन सोसायटीसमोर, पानटपरीजवळ, बोटक्लब रोड,पुणे येथे 14.08 वाजता तक्रारदारांकडून दीड लाख रुपये लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यास रंगेहाथ पकडण्यात आले असून आलोसे गणेश कसपटे यांना ताब्यात घेतेवेळी त्यांनी तक्रारदार यांच्या छातीस चावा घेतलेला असून सापळा पथकास धक्काबुक्की करून शासकिय कामात अडथळा आणत पळून जाण्याचा प्रयत्न केला आहे.

वर नमुद आरोपीस ताब्यात घेऊन त्यांच्याविरूध्द कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम 7, भारतीय न्याय संहिता कलम 132,115(2) नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.

1) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक -020-26122134, 26132802, 26050423, **9403781064**
2) व्हॉट्स-ॲप क्रमांक - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
4) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
5) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

सहायक पो आयुक्त/पोलीस उप-अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो
सत्यमेव जयते

DYSP 06/05/2026

(सतिश संभाजी वाळके)
सहा.पोलीस आयुक्त/पो.उप.अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे